पुर्नविचार करण्याची संधी दिली, परंतू, तो त्याचेवर कोणचाही दबाव नाही व त्याला स्वतःहुन गुन्हा कबूल करावयाचा आहे असे कथन करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी स्वतःहुन गुन्हा कबूल करीत आहे व त्याचेवर कोणाचाही दबाव नाही. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आ दे श :**

१. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपी जयेश किशोर शाह यांना भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला १,०००/- रूपये (एक हजार रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १ (एक) महिन्याचे साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

२. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५२ अंतर्गत आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम ३३६ खाली शिक्षापात्र अपराधासाठी दोषी धरण्यात येत आहे व त्याला २५०/- रूपये (दोनशे पन्नास रूपये फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे व आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याला १५ (पंधरा) दिवसांची साधे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात यावी.

३. आरोपीला आदेशाची प्रमाणित प्रत विनामूल्य पुरविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)

2/1/24

**(एस. एम. ए. सय्यद)**
महानगर दंडाधिकारी
६८ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई

दिनांक : 02/01/2024

Paid Rs. 1250/-
Recpt. No. 82143
Head Cashier
Borivali Centre of Courts, Mumbai
2/1/24